मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# केंद्रीय सनदी अधिकारी प्रशिक्षणार्थींची पिंपरी महापालिकेच्या विविध प्रकल्पांना भेट

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने डिजिटलायझेशनमध्ये लक्षणीय प्रगती : 'जलद गतीने सेवा देण्यासाठी महापालिका कटिबद्ध'; आयुक्त शेखर सिंह

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने डिजिटलायझेशनमध्ये लक्षणीय प्रगती केली असून यामागील उद्देश सार्वजनिक सेवेचे वितरण आणि पारदर्शकता वाढवणे हा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून प्रमुख सेवांचे डिजिटलायझेशन करून नागरिकांना अधिक सुलभ आणि जलद गतीने सेवा देण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.



केंद्रीय नागरी सेवेतील सनदी अधिकारी प्रशिक्षणार्थींनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध प्रकल्प आणि उपक्रमांना भेट दिली. या अधिकाऱ्यांशी आयुक्त शेखर सिंह यांनी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे कार्यकारी व्यवस्थापक ओमप्रकाश देशमुख, उप आयुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, श्रीनिवास दांगट, उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, मनोहर जावरानी, लक्ष्मीकांत कोल्हे, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, संचालक अभिजीत मुरुगकर, वास्तुविशारद प्रसन्न देसाई, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) समन्वयक अनंत पोरे आदी उपस्थित होते.

प्रशिक्षणार्थींमध्ये अलोक कुमार, अनन्या किर्ती, अमनदिप, अर्घ्य पटनाईक, अमित जैन, निखिल खरे, एम.व्ही सत्यसाई कार्तिक, राघव तनेजा, अंकित कुमार संखवत, राहुल कुमार, अरूण पवित्रण, हार्दिक अग्रवाल, अरविंद मीना, नेहा विरावल्ली, बलवीर सिंग, अलोक राजन राय, धीरज कुनूबिल्ली, भूर सिंग मीना, गरीमा, राकेश बानोथ, महेश गीते, हरी शंकर, मिनाक्षी दास, हर्षा प्रियंवदा, वदिथ्य नाईक, जगदीश अदाहल्ली, महेश जुवन्नापुडी, कंभान सॅम्युलप्रविणगौथम, अरविंद कुमार, अभिजीत कुमार, धीरज कुमार, संजीव कुमार, शरन्या पोलुमती या भारतीय पोलीस सेवा, भारतीय रेल्वे वाहतूक सेवा, भारतीय महसूल सेवा, भारतीय माहिती सेवा, भारतीय टपाल सेवा, भारतीय लेखापरिक्षण व लेखा सेवा, भारतीय नागरी लेखा सेवा, भारतीय कॉर्पोरेट कायदा सेवा, भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांचा समावेश होता.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, महापालिकेचा ऑनलाइन कर भरणा, ऑनलाइन विवाह नोंदणी, जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र सुविधा, समाजविकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा, लॉगिन आयडीचा वापर करून नागरिकांच्या सोयीसाठी तक्रार निवारण यंत्रणा, महापालिका कार्यालये तसेच स्मार्ट टॉयलेट शोधण्यासाठी जीपीएस यंत्रणेचा वापर, आपत्कालीन वेळेत संपर्क साधण्यासाठी मदत कार्य, स्थानिक अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी पुढाकार, वेबिनारचे आयोजन, महापालिकेच्या आरोग्य अभियानांची माहिती आदी सुविधांचा ई-गव्हर्नन्स प्लॅटफॉर्ममध्ये समावेश केल्याने नागरिक कोणत्याही अडथळ्याशिवाय थेट प्रशासानाशी संवाद साधू शकतात. या डिजिटल साधनांमुळे केवळ कार्यक्षमतेत वाढ झाली नसून सर्वसमावेशकतेमध्येही सुधारणा झाली आहे. डिजिटलायझेशनच्या दिशेने चालू असलेला हा प्रवास शाश्वत शहरी विकासासाठी असलेली महापालिकेची वचनबद्धता दर्शवितो, असे ते म्हणाले. जमिनीवरील भूक्षेत्राचे मोजमाप तसेच जमीनीखालील विविध वाहिन्यांची माहिती जीआयएस प्रणालीद्वारे उपलब्ध करून घेण्याच्या उपक्रमाला देखील महापालिकेने सुरूवात केली आहे. त्यामुळे शहराचे भविष्यातील नियोजन करताना या सर्व तंत्रज्ञानयुक्त उपक्रम आणि प्रकल्पांचा महापालिका प्रशासनाला उपयोग होतो. सद्यस्थितीत शहरात वाहतुक कोंडीची समस्या उद्भवत असून त्यावर उपाययोजना करण्यासाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून महापालिकेने आराखडा तयार करण्यास सुरूवात केली आहे. इंडिग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर (आयसीसीसी) च्या माध्यमातून शहरातील विविध भागांवर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, अशी माहिती आयुक्त सिंह यांनी दिली.

# पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचा शैक्षणिक सामंजस्य करार

## पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट आणि क्वांगवून विद्यापीठ यांच्या मध्ये नुकताच शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला

**पिंपरी | प्रतिनिधी**

दक्षिण कोरियातील क्वांगवून विद्यापीठ जागतिक पातळीवर उत्कृष्ट, दर्जेदार, आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान शिक्षण देण्यासाठी नावलौकिक मिळवला आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) शैक्षणिक समूहातील संस्थेमधील विद्यार्थी, प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च शैक्षणिक संधी, संशोधन करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे असे मत दक्षिण कोरियाच्या क्वांगवून विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विभाग संचालक डॉ. सुंगवू बेंजामिन चो यांनी व्यक्त केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) आणि क्वांगवून विद्यापीठ यांच्या मध्ये नुकताच शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे झालेल्या कार्यक्रमात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारामुळे पीसीईटी येथे कोरियन भाषा केंद्र, अल्प मुदतीचे पदविका अभ्यासक्रम, द्विपक्षीय संशोधन, कार्यशाळा आयोजित करण्यास मदत मिळणार आहे.

यावेळी वुई ब्रिंगच्या मुख्य कार्यकारी अधिकारी टीना चो, क्वांगवून विद्यापीठातील इलेक्ट्रिकल आणि बायोलॉजिकल फिजिक्स आणि प्लाझ्मा बायोसायन्स रिसर्च सेंटर विभागाचे प्रा. नागेंद्रकुमार कौशिक, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीईटी आंतरराष्ट्रीय संबंध, संशोधन सल्लागार डॉ. दिनेश अमळनेरकर व विविध विद्याशाखेचे विभागप्रमुख उपस्थित होते.

क्वांगवून विद्यापीठा बरोबर झालेल्या या सामंजस्य करारामुळे पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे कोरियन भाषा केंद्र स्थापन करण्यात येणार असून या अंतर्गत विद्यार्थ्यांना कोरियन भाषा प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच सेमीकंडक्टर या विषया मधील संशोधनाला चालना देण्यासाठी सेंटर ऑफ एक्सीलेंस सुरु करण्यात येणार आहे. अल्पकालीन प्रशिक्षण अंतर्गत दोन ते सहा महिन्यांचे प्रशिक्षण हे या करारामधील वैशिष्ठ्य आहे. . कोरियात जाऊन, संशोधन करणे, शिक्षण संस्थांना भेटी देणे, पदवी, पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणे, शिक्षणाबरोबरच कोरियन संस्कृती, सामाजिक जडणघडण याची माहिती घेता येईल. त्याचप्रमाणे कोरियन विद्यार्थी पीसीईटी येथे येऊन शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांत सहभागी होतील. यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, कौशल्य विकास होण्यासाठी मदत होईल, असे डॉ. गिरीश देसाई म्हणाले.

# भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन 'किसान' मोशी येथे सुरु; 15 डिसेंबर पर्यंत आयोजन

## कृषि प्रदर्शनाचे उदघाटन प्रदर्शनाला येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पहिल्या गटाच्या हस्ते करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

किसान' या भारतातील सर्वात मोठ्या कृषि प्रदर्शनाचे उदघाटन प्रदर्शनाला येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पहिल्या गटाच्या हस्ते करण्यात आले. दिनांक ११ ते १५ डिसेंबर २०२४ दरम्यान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी, पुणे येथे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.



१५ एकर पसरलेल्या प्रदर्शनात ५०० हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था व नवउद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनाच्या ५ दिवसांमध्ये देशभरातून एक लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

किसान प्रदर्शनाला शेती क्षेत्रातील मान्यवर संस्थांचा सहभाग व सहकार्य लाभले आहे. यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक दालनात त्या विशिष्ठ उद्योगातील कंपन्यांचे स्टॉल शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. शेतीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणांचे प्रदर्शन खुल्या जागेत आयोजित केले आहे.

पूर्वनोंदणी : प्रदर्शनाच्या प्रवेशव्दारावर मोबाईल ॲपद्वारे आगाऊ नावनोंदणीची सोय केली आहे. ३०,००० हुन अधिक शेतकऱ्यांनी पूर्वनोंदणी केली असून ही संख्या १००,००० ओलांडण्याची अपेक्षा आहे.

किसान आता मोबाईलवरसुद्धा – प्रत्यक्ष प्रदर्शनातील सहभागासोबतच प्रदर्शक कंपन्या किसान ॲपवर त्यांच्या उत्पादनांची डिजिटल यादी देखील प्रसिद्ध करू शकतात. शेतकरी घरबसल्या विविध उत्पादनांविषयी माहिती मिळवू शकतात आणि त्यांच्या मोबाईलवर संबंधित व्हिडिओ पाहू शकतात. प्रदर्शक आणि अभ्यागत प्रत्यक्ष प्रदर्शनात भेटण्यापूर्वीच किसान ॲपच्या माध्यमातून परस्परांशी संवाद सुरू करू शकतात.

मातीमोल : या वर्षी किसानमध्ये मातीमोल हा मातीच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारा उपक्रम साजरा केला जात आहे. आपली माती जिवंत आहे की नाही? यावर चर्चा सुरू करणे, मातीच्या आरोग्याविषयी शेतकरी समुदायामध्ये जागरूकता वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. चला आपल्या मातीची स्थिती अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊया, अर्थात मातीमोल जाणूया. हा उपक्रम जैवतंत्रज्ञान विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरेखित विभागांसोबत संयुक्तपणे आयोजित करण्यात येत आहे.

# स्कूल बस आरटीओच्या रडारवर

## खराडीत आगीची घटना घडल्यानंतर शहरासह उपनगरात आरटीओच्या तपास पथकांकडून कसून तपासणी

**पुणे | प्रतिनिधी**

खराडी भागातील एका शाळेतील १५ ते २० विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी निघालेल्या स्कूल बसला आग लागली होती. सुदैवाने यात कोणतीही जिवीत हानी झाली नव्हती. मात्र अद्याप स्कूल बसला लागलेल्या आगीचे कारण समोर आलेले नाही. या घटनेमुळे स्कूल बस पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या रडारवर आल्या असून शहरासह उपनगर भागातील स्कूल बसची कसून तपासणी सुरू झाली आहे.

पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून सातत्याने स्कूल बसची तपासणी केली जाते. विधानसभा निवडणुकीच्या काळात ही तपासणी मोहीम थांबली होती. परंतु खराडीतील घटनेनंतर तपासणी मोहीम पुन्हा सुरु करण्यात आली आहे. पुणे आरटीओने ११ महिन्यांत एकूण दीड हजार स्कूलबसची तपासणी केली आहे. त्यावेळी ६०१ स्कूल बस दोषी आढळून आल्या. त्यांच्याकडून २१ लाख ७९ हजार रुपये दंड वसूल केला आहे. तसेच, न्यायालयाने चार स्कूल बसवर कारवाई करून त्यांच्यावर दंडही ठोठावला आहे.

दरम्यान, खराडी परिसरात आग लागलेल्या स्कूलबसची सर्व कागदपत्रे पूर्ण होती. या स्कूलबसचा फिटनेस परवाना ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे. तर, पीयूसी २०२७ पर्यंतची आहे. या स्कूलबसला आग का लागली, याची तपासणी केली जात आहे. या घटनेपूर्वीदेखील आरटीओकडून स्कूलबसची सतत तपासणी केली जात होती. आता आगीच्या घटनेनंतर तपासणीचा वेग वाढविण्यात आला आहे. शहर आणि जिल्ह्यात पथकाकडून तपासणी तसेच कारवाई सुरू आहे, अशी माहिती पुणे विभागाचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी प्रसार माध्यमांनी दिली.

पालकांनी कामामुळे त्यांच्या पाल्यांना प्रत्यक्षात जावून शाळेत सोडणे शक्य होत नाही. तसेच विद्यार्थ्यांनी वेळेत शाळेत पोहचावे म्हणून स्कूल बसचा पर्याय पालकांना योग्य वाटतो. त्यामुळे स्कूल बस या सुरक्षित हव्यात, असे पालकांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची काळजी स्कूल बस धारकवर आहे. असे पालकांनी सांगितले. दरम्यान स्कूल बसला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर पालकांची काळजी वाढली आहे. स्कूल बस धारक, शाळा आणि आरटीओने पालकांना दिलासा देण्याची गरज असल्याचे मत पालकांचे आहे.



"स्कूलबससह स्कूल व्हॅनची असुरक्षितता लक्षात घेणे आवश्यक आहे. या व्हॅनमध्ये अनेकदा घरगुती गॅस सिलेंडरचा वापर केल्याचे दिसून आले आहे. या व्हॅनला फ्रंट मार्जिन कमी असते. त्यामुळे त्या सुरक्षित वाटत नाहीत. हा प्रकार गंभीर आहे. यावरुन अनेक वर्षांपासून नुसती चर्चा केली जाते. परंतु त्याची जबाबदारी घेण्यास कोणी तयार नाही. पोलीस, आरटीओ आणि शाळा प्रशासन स्कूल बसची जबाबदारी घेत नाही. त्यामुळे ही जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्नच आहे.

- मुकुंद किर्दत, समन्वयक, आप पालक युनियन

"खराडीत स्कूलबसला लागलेल्या आगीच्या घटनेपूर्वीदेखील आरटीओकडून स्कूलबसची सतत तपासणी केली जात होती. या घटनेनंतर तपासणीचा वेग वाढविण्यात आला आहे. शहर आणि जिल्ह्यात पथकाकडून तपासणी तसेच कारवाई सुरू आहे.

- स्वप्नील भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे विभाग

### तपासणी करणाऱ्या आरटीओ अधिकाऱ्यालाही जबाबदार धरावे...

» स्कूलबससह स्कूल व्हॅनची असुरक्षितता लक्षात घेणे आवश्यक आहे. या व्हॅनमध्ये अनेकदा घरगुती गॅस सिलेंडरचा वापर केल्याचे दिसून आले आहे. या व्हॅनला फ्रंट मार्जिन कमी असते. त्यामुळे त्या सुरक्षित वाटत नाहीत. हा प्रकार गंभीर आहे. यावरुन अनेक वर्षांपासून नुसती चर्चा केली जाते. परंतु त्याची जबाबदारी घेण्यास कोणी तयार नाही. पोलीस, आरटीओ आणि शाळा प्रशासन स्कूल बसची जबाबदारी घेत नाही. त्यामुळे ही जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्न आहे. आरटीओकडून मार्च, एप्रिल महिन्यात स्कूलबस, व्हॅनची तपासणी करुन प्रमाणपत्र दिले जाते. परंतु ही तपासणी करताना कितपत नियमांचे पालन केले जाते, हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे तपासणी आरटीओ अधिकाऱ्यालादेखील जबाबदार धरले पाहिजे.  शासनाने नवीन नियमावली आणली परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. स्कूल बसबाबतची जबाबदारी निश्चित केल्याशिवाय सुरक्षितता वाढणार नाही, अशी सूचना आम आदमी पक्षाच्या पालक युनियनचे समन्वयक मुकुंद किर्दत यांनी केली.

# एकता नगरीतील पूरग्रस्त नागरिकांचे पुनर्वसन करणार

## क्लस्टर डेव्हलपमेंटच्या प्रस्तावावर महापालिकेचे शिक्कामोर्तब

**पिंपरी | प्रतिनिधी**

एकता नगरी येथील पूरग्रस्त भागातील नागरिकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे, त्यासाठी क्लस्टर डेव्हलपमेंटच्या प्रस्तावावर महापालिकेने शिक्कामोर्तब केले आहे. त्याअंतर्गत विठ्ठलवाडी (हिंगणे खुर्द) येथील नियोजित सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याच्या मागील बाजूस महापालिकेच्या जागेवर पुनर्वसन केले जाणार आहे. त्यासाठीचा प्रस्ताव महापालिकेने राज्य शासनाकडे मंगळवारी सादर केला असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.



महापालिकेने पूरस्थिती नंतर केलेल्या सर्वेक्षणात निळ्या पूर रेषेसह निळ्या-लाल पूर रेषेच्या आतमध्ये १०३ इमारती आढळून आल्या. त्यामध्ये १ हजार ३८३ सदनिका तर ६७ दुकानांचा समावेश आहे. या इमारतीचे निवासी क्षेत्रफळ हे ८७ हजार ३९९ चौरस मीटर असून, व्यापारी क्षेत्र १ हजार ३४० चौरस मीटर इतके आहे. यावर्षी २५ जुलैला मध्यरात्री खडकवासला धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे मुठा नदीत पूरस्थिती उद्भवली होती.

त्यानंतर, राज्यभर या पुराची चर्चा झाल्याने या भागात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी हजेरी लावत पुनर्वसनाची मागणी केली होती तर एकनाथ शिंदे यांनी ठाणे येथील क्लस्टर डेव्हलपमेंटच्या धर्तीवर या भागाचे पुनर्वसन करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार, महापालिकेने प्रस्ताव तयार केला असून महापालिका अधिकाऱ्यांनी तो मंत्रालयात सादर केला आहे.

बांधकाम नियमावलीनुसार दाट लोकवस्ती नसलेल्या भागात दोन हेक्टरपेक्षा जास्त भूखंडावर क्लस्टर करता येऊ शकते. ठाण्यात या पद्धतीने राज्य सरकारने क्लस्टर योजना राबविली, त्याच पद्धतीने एकतानगरीमध्ये आराखडा तयार केला जाणार आहे. याप्रकल्पासाठी सुमारे ६९८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.असे असल्याची माहिती आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले दिली.

# पुणे महापालिका निवडणूकांची तयारी झाली

## महापालिका निवडणूकीसाठी प्रत्येक विधानसभा मतदार संघात निरीक्षक नियुक्त केले जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

एकीकडे विधानसभेत महायुतीतील भाजपाला मोठे यश मिळाल्याने आता पुणे महानगर पालिकेत पुन्हा सत्ता आणण्याची जोरदार तयारी एकीकडे भाजपाने सुरु केली आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीतील प्रत्येक घटक पक्षाने स्वतंत्रपणे लढण्याची तयारी सुरु केली आहे. गेली अडीच वर्षे पुणे महानगरपालिकेत प्रशासक असल्याने पुणेकरांच्या नागरी प्रश्नांकडे दुर्लक्ष झालेले आहे. भाजपाला महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीत १३२ हून अधिक जागा मिळाल्याने भाजपाचा आत्मविश्वासात वाढ झालेली आहे.



भाजपाने पश्चिम महाराष्ट्रातील राष्ट्रवादी कॉंग्रेसची एकाधिकार शाही मोडीत काढली असल्याने भाजपा आता आपला सर्वाधिक मतदार असलेल्या पुण्याच्या महापालिकेत सत्ता मिळविण्यासाठी कामाला लागले आहे. पुणे शहरातील विधानसभेत भाजपाने ५० हजार भाजप सदस्यांच्या नोंदणीचे लक्ष्य ठेवले आहे. तर शहरातील प्रत्येक प्रभागात दहा हजार भाजपाचे सदस्य नोंदणीचे लक्ष्य आहे. महापालिका निवडणूकीसाठी प्रत्येक विधानसभा मतदार संघात निरीक्षक नियुक्त केले जाणार आहेत. पुणे शहर भाजपा यासाठी लवकरच प्रभाग निहाय बैठका घेणार आहे.

या संदर्भात भाजपाचे कसबा येथील आमदार हेमंत रासने यांनी प्रतिक्रीया दिलेली आहे. विधानसभा निवडणूकांच्या निकालानंतर भाजपाने महापालिका निवडणूकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. तर दुसरीकडे विरोधी पक्षांकडून कोणतीही तयार होताना दिसत नाही. महाविकास आघाडी म्हणून निवडणुकीला एकत्र सामोरे जायचे की स्वबळावर महापालिका निवडणूक लढवायची यावर महाविकास आघाडीत अजूनही एकमत होताना दिसत नाही असे भाजपा आमदार हेमंत रासने यांनी टीव्ही ९ मराठीशी बोलताना म्हटले आहे.]

आमची स्वबळावर निवडणूका लढायची तयारी असली तरी महाविकास आघाडीत एकमेकांचा मान सन्मान राखला गेला पाहिजे, अन्यथा स्वबळावर निवडणूका लढण्याची तयारी आम्ही ठेवलेली आली आहे असे शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी म्हटले आहे.दुसरीकडे कॉंग्रेसने जर महाविकास आघाडीत पुणे महापालिका एकत्र लढविण्याचे ठरले नाही तर आम्ही देखील स्वतंत्रपणे लढण्याची तयारी ठेवल्याचे कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी म्हटले आहे.

# मोशीतील 'पीआयईसीसी'चे रूपडे पालटणार

## पीएमआरडीए देणार अद्ययावत सुविधा, लाखो नोकऱ्या उपलब्ध होणार : शहराच्या वैभवात पडणार भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील महत्त्वाच्यापैकी एक असलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेन्शन सेंटर अर्थातच पीआयईसीसी कात टाकणार आहे. भविष्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होण्याच्या दृष्टीने या केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले जाणार आहेत. व्यापार केंद्र (कन्व्हेन्शन हॉल), पंचतारांकित हॉटेल, आर्थिक दृष्ट्या परवडणारी हॉटेल्स, परिषद सभागृह (कॉन्फरन्स हॉल) यासह व्यावसायिक भूखंड विकसित करण्यात येणार आहेत. त्यामुळे येथे जवळपास एक लाख तरुणांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या विकास प्रकल्पांमुळे पिंपरी-चिंचवडच्या वैभवातही मोठ्या प्रमाणात भर पडेल.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अंतर्गत मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि व्यापार केंद्र येथे ९६ हेक्टर भूखंडावर सुमारे २ हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे.




यापैकी अर्थसंकल्पामध्ये जवळपास ९८२ कोटी अंदाजित खर्च आहे. पीएमआरडीएच्या मोशी येथील भूखंडावर आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र विकसित करण्यात येत आहे. याठिकाणी आजपर्यंत आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन, लष्कराचे शस्त्रास्त्र प्रदर्शन भरवण्यात आले. त्याचप्रमाणे ऑटोमॅटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया याचे देखील प्रदर्शन या ठिकाणी भरवले होते. आत्तापर्यंत जवळपास १२ हुन अधिक प्रदर्शन व कार्यक्रम या ठिकाणी झाले.

पीएमआरडीए स्वतः बांधकाम क्षेत्रातील उद्योजकांसाठी येथे दर्जेदार बांधकामांशी संबंधित प्रदर्शन भरवत असते. केंद्रातील केवळ दहा टक्के विकास प्रकल्प आजपर्यंत विकसित आले आहेत. आता उर्वरीत विकास प्रकल्पही विकसित करण्यात येणार आहेत. महानगर आयुक्त योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदर्शन केंद्रातील ९६ हेक्टर जागेवर मोठ्या प्रमाणात बदल करण्यात येणार आहेत. तब्बल ५ हजार प्रेक्षकांची आसन क्षमता असणारा कन्व्हेन्शन हॉल तयार करण्यात येणार आहे. ३५ हजार स्क्वेअर मीटरचे ३ सभागृह तयार करण्यात येणार आहेत. एक पंचतारांकीत हॉटेल आणि सर्वसामान्यांना परवडणारे तीन हॉटेल बांधण्यात येणार आहेत. उर्वरीत मोकळ्या भूखंडावर वाणिज्य वापरासाठी प्लॉटींग विकसित करण्यात येणार आहे.

विकासकामांचे विविध टप्पे करण्यात आले आहेत. हे काम पूर्ण होण्यासाठी किमान दहा वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे. हा संपूर्ण प्रकल्प विकसित झाल्यानंतर पिंपरी-चिंचवडसह लगतच्या भागातील तरुणांसाठी किमान एक लाख नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या प्रकल्पातील सर्व विकासकामे पीपीपी तत्वावर करण्यात येईल, महानगर आयुक्त योगेश म्हसे यांच्या सूचनेनुसार हा प्रकल्प तयार होणार आहे.

### पिंपरी-चिंचवड येणार केंद्रस्थानी

» प्राधिकरणाकडून उभारण्यात आलेला हा प्रकल्प दहा वर्षांत पूर्ण होईल. त्यानंतर पिंपरी-चिंचवड शहर मोठ्या प्रमाणात केंद्रस्थानी होणार आहे. सद्यस्थितीत बंगळूर, मुंबई आणि त्यानंतर मोशी या ठिकाणी प्रदर्शन केंद्रासाठी मागणी होऊ लागली आहे. आणखी काही प्रकल्प प्राधिकरणाकडे विचाराधीन आहेत. या प्रकल्पांमुळे शहराचा चेहरा मोहरा बदलणार आहे, अशी माहिती कार्यकारी अभियंता प्रभाकर वसईकर यांनी दिली.

### प्रदर्शनाच्या माध्यमातून सव्वा दोन कोटींचा महसूल

या केंद्रात मंजूर आराखड्यानुसार एकूण क्षेत्र ९६.९७ हेक्टर आहे. तर, खुले प्रदर्शन केंद्र ९.८० हेक्टर वर उभारण्यात आले आहे. गेल्या वर्षभरात याला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यात चालू वर्षामध्ये जवळपास ९ मोठे प्रदर्शन भरवण्यात आले होते. काही प्रदर्शन दोन दिवस तर, काही पंधरा दिवस होते. या माध्यमातून प्राधिकरणा जमीन व महसूल विभागात तब्बल २ कोटी ३० लाख ७२ हजारांचा महसूल प्राप्त झालेला आहे.

> मोशीत उभारण्यात येणाऱ्या अद्ययावत प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटरमुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात आणखी भर पडेल.या प्रकल्पाबद्दल वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून, त्या अनुषंगाने एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट काढले आहे. लवकरच त्यावर कार्यवाही होणार आहे.
>
> - डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.

# जलतरण तलावांची जबाबदारी पुन्हा ठेकेदारांवरच

## पालिकेचे दहा जलतरण तलाव तीन वर्षे ठेकेदार चालवणार : कोट्यवधींच्या खर्चात बचत होणार असल्याचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शहरातील १० सार्वजनिक जलतरण तलाव ठेकेदारांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. पुढील तीन वर्षे हे तलाव संबंधित ठेकेदार चालवणार आहे. तिकीट विक्री, स्वच्छता, सुरक्षा, पाणी शुद्धीकरण आदी सर्व कामकाज ते पाहणार आहे. परिणामी, महापालिकेच्या कोट्यवधी रूपये खर्चाची बचत होणार आहे, असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.



महापालिकेने शहरातील दहा जलतरण तलाव चालवण्यास देण्यासाठी दोन ते तीन वेळा निविदा प्रसिद्ध केली होती. मात्र, अटी व शर्तीमुळे त्याला प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यामुळे निविदा रद्द करण्याची वेळ क्रीडा विभागावर आली होती. अखेर, अटी व शर्तीत बदल करून नव्याने निविदा १३ ऑगस्ट २०२४ ला प्रसिद्ध केली होती. त्याला ठेकेदारांचा प्रतिसाद मिळाला. त्यातील अधिक उत्पन्न देणाऱ्या ठेकेदारांना तलाव चालवण्यासाठी देण्यास स्थायी समितीची मान्यता आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंगळवारी (दि.१०) दिली आहे. यामुळे महापालिकेचा जलतरण तलावावर होणाऱ्या कोट्यवधींच्या खर्चात बचत होणार आहे.

पाणी शुद्धीकरण, सुरक्षारक्षक, जीवरक्षक, कर्मचारी, क्रीडापर्यवेक्षक तसेच, दुरूस्ती काम, सुशोभीकरण, वीज बिल, पाणीपट्टी व इतर खर्च वाचणार आहे. ठेकेदारांकडून महापालिकेस एका तलावासाठी तीन वर्षांकरीता एकूण २८ लाख ६५ हजार ६०० रूपयांचे उत्पन्न मिळणार आहे. थेरगाव तलावासाठी १८ लाख ७२ हजार आणि नेहरू नगर तलावासाठी २७ लाख रूपये महापालिका तिजोरीत जमा होणार आहेत. दरम्यान, कसबा पेठ येथील एचटूओ टेक्रो या ठेकेदाराला संभाजीनगर, वडमुखवाडी, यमुनानगर आणि पिंपळे गुरव हे चार तलाव देण्यात आले आहेत. तर, कसबा पेठेतील अवधूत फडतरे या ठेकेदाराला भोसरी, पिंपरी गाव, सांगवी आणि कासारवाडी हे चार तलाव चालविण्यास मान्यता दिली आहे. शुक्रवार पेठेतील एचटूओ ॲक्वा फन अनलिमिटेड पुल्सला नेहरूनगरचा आणि खडकवासला येथील हर्षवर्धन डेव्हलपर्सला थेरगाव तलाव देण्यात आला आहे.

# रिंग रोडसाठी 200 हेक्टर भूसंपादन बाकी

## रिंग रोडच्या भूसंपादनासाठी एमएसआरडीसीकडे 500 कोटींची मागणी



**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या पुण्याच्या वर्तुळाकार मार्गासाठी (रिंग रोड) पूर्व आणि पश्चिम भागातील २०० हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन बाकी असून, त्यासाठी ५०० कोटी रुपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे केली आहे. दरम्यान, येत्या रविवारपर्यंत (१५ डिसेंबर) जमीनमालकांनी संमतीने जागा दिल्यास त्यांना २५ टक्के मोबदला दिला जाणार असून, त्यानंतर सक्तीने भूसंपादन केले जाणार आहे.

पुणे रिंग रोडच्या प्रलंबित भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी बुधवारी बैठक घेतली. त्यावेळी भूसंपादन समन्वयक कल्याण पांढरे तसेच विविध ठिकाणचे भूसंपादन अधिकारी उपस्थित होते. रिंग रोडसाठी सुमारे ९० टक्के भूसंपादन पूर्ण झाल्याचा दावा जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आला.

रिंग रोडसाठी १ हजार ७४० हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. त्यापैकी पूर्व भागात ४७ गावांमधून ८५८.९६ हेक्टर, तर पश्चिम भागातील ३६ गावांतील ६४४.११ हेक्टर क्षेत्र संपादन करण्याचे उद्दिष्ट होते. सुमारे १ हजार ३०० हेक्टर क्षेत्र संपादित झाले आहे. पूर्व भागातील १४३ आणि पश्चिम भागातील ६३ हेक्टर म्हणजेच एकूण २०६ हेक्टर क्षेत्राचे संपादन अद्यापही बाकी आहे. भूसंपादन झालेल्या क्षेत्राचे निवाडे करण्याची प्रक्रियाही जिल्हा प्रशासनाकडून हाती घेण्यात आल्याची माहिती भूसंपादन समन्वयक कल्याण पांढरे यांनी दिली.

> रिंग रोडसाठीचे भूसंपादन अंतिम टप्प्यात आले आहे. सुमारे २०० हेक्टर क्षेत्र संपादन तातडीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासाठी सुमारे पाचशे कोटी रुपयांची मागणी रस्ते विकास महामंडळाकडे करण्यात आली आहे.
> **- डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी.**

पूर्व भागातील पुरंदर, भोर, हवेली, मुळशी आणि मावळ तालुक्यातील तसेच पश्चिम भागातील खेड आणि मावळ या दोन तालुक्यांतील काही क्षेत्राचे संपादन करणे बाकी आहे. त्यासंदर्भात येत्या १५ डिसेंबरपर्यंत होणारे भूसंपादन संमतीने झाल्यास २५ टक्के मोबदला दिला जाणार आहे. त्यानंतर होणारे भूसंपादन हे सक्तीने करण्यात येणार आहे. त्यामुळे सक्तीच्या भूसंपादनात चारपटीने मोबादला देण्यात येणार आहे. त्यासंदर्भात तालुका भूसंपादन अधिकाऱ्यांना तशी स्पष्ट सूचना बैठकीत करण्यात आली.

सध्या काही भूसंपादन अधिकाऱ्यांकडे निवाड्याच्या रकमेपैकी काही रक्कम शिल्लक आहे. मात्र, उर्वरित २०६ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाला निधीची गरज आहे. त्याकरिता राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सुमारे ५०० कोटी रुपयांची मागणी जिल्हा प्रशासनाने केली आहे. संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यांकडे रक्कम जमा करावी, अशी सूचनाही जिल्हा प्रशासनाने या बैठकीत रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.

# 'डीप क्लीन ड्राइव्ह' अंतर्गत लोहगावात धडक कारवाई

## एकूण 83 वृक्षांची छाटणी : रस्त्यांवरील 2100 चौरस मीटरचे खड्डे बुजविले



**पुणे | प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत लोहगावात नगर रस्ता क्षेत्रीय कार्यालय, येरवडा क्षेत्रीय कार्यालय व ढोले-पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.11) 'डीप क्लीन ड्राइव्ह' राबविण्यात आले. त्यानिमित्त लोहगावात जनजागृती रॅली काढण्यात आली. या मोहिमेत अतिक्रमण, ड्रेनेज, पथ, आरोग्य, वृक्ष प्राधिकरण, बांधकाम आदी विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

'डीप क्लीन ड्राइव्ह'अंतर्गत लोहगाव बसथांबा, स्मशानभूमी, बाजारतळाजवळील पाण्याची टाकी परिसर, धानोरी- लोहगाव रस्ता, पोरवाल रस्ता आदी भागांत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. लोहगाव बसथांब्याजवळील हातगाड्या, टपऱ्या हटविण्यात आल्या. फ्रंट मर्जिनमधील अतिक्रमणे, अनधिकृत फ्लेक्स व पथदिव्यांना लटकलेल्या केबल काढण्यात आल्या. एकूण 83 वृक्षांची छाटणी करण्यात आली. रस्त्यांवरील 2100 चौरस मीटरचे खड्डे बुजविण्यात आले.

कोणतीही सूचना न देता लोहगाव बसस्थानक परिसरातील टपऱ्यांवर अतिक्रमण विभागाने कारवाई केल्याचे येथील व्यावसायिकांनी सांगितले. पोरवाल रस्त्यावर मोठ्या प्रमाणात फ्रंट मार्जिनमधील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. त्या वेळी एका ठिकाणी अधिकारी

### विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली

» स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी रॅली काढली. 'माझे रस्ते होते छान, कोणी ते केले घाण?', 'संत गाडगेबाबा यांचे आदर्श कर्म, स्वच्छता हाच माझा धर्म' अशा आशयाचे फलक हाती घेऊन विद्यार्थ्यांनी स्वच्छतेबाबतच्या घोषणा दिल्या. या वेळी आमदार बापूसाहेब पठारे, सुनील खांदवे, राजेंद्र खांदवे, प्रीतम खांदवे, नीलेश पवार, नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक महापालिका आयुक्त संजय पोळ, येरवडा क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक महापालिका आयुक्त संदीप खलाटे आदी उपस्थित होते.

व व्यापाऱ्यांमध्ये बाचाबाची झाली. नुकसान होऊ नये म्हणून काही व्यावसायिकांनी स्वतःच अतिक्रमणे हटविली. अचानक झालेल्या कारवाईमुळे व्यावसायिकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले.रस्त्यावर पडून असलेल्या वाहनांवरही कारवाईच्या नोटीस चिटकविण्यात आल्या.

> चार हातगाड्या, पाच स्टॉलवर तसेच 17 हजार 920 चौरस फुटांचे कच्चे-पक्के बांधकाम काढण्यात आले आहे. तसेच, सुमारे अठरा टन राडारोडा उचलण्यात आला आहे.
> **- संजय पोळ, सहायक आयुक्त, नगर रस्ता क्षेत्रीय कार्यालय.**